**Q.P. Code: 32445**

वेळ - २ तास ३० मी. गुण - ७५

---

सूचना :

१) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

२) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

१. अ) १९ व्या शतकातील मराठी नियतकालिकांनी प्रबोधनाचे कार्य कसे केले, ते सोदाहरण सांगा. १५

**किंवा**

आ) ‘साहित्य हा समाजसापेक्ष सर्जनशील आविष्कार होय’ या विधानाची रा.ग.जाधव यांच्या ‘हस्तिदंती मनोऱ्याबाहेर’ या लेखाच्या आधारे परामर्श घ्या.

२.अ) ग्रामीणता म्हणजे काय ते सांगून ग्रामीण साहित्य प्रवाहाचे स्वरूप स्पष्ट करा. १५

**किंवा**

आ) कापूस पिकवणाऱ्या शेतकऱ्यांच्या शोषणाची व दु:खमय जगण्याची कथा ‘कापूसकाळ’ या कादंबरीत कशी मांडली आहे,याची चर्चा करा.

३.अ) दलित साहित्यामधून स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांची जपणूक कशी केली आहे, ते सोदाहरण सांगा. १५

**किंवा**

आ) हिरा बनसोडे यांच्या ‘फिर्याद’ या काव्यसंग्रहातून स्त्रीत्व आणि दलितत्त्वाची वेदना कशी साकारली आहे, ते उदाहरणासह सांगा.



22144612C081AEEEE31A908FB7E78B74

**Q.P. Code: 32445**

४. टिपा लिहा (एकूण तीन) १५

क) १९ व्या शतकातील सुधारणावाद व मराठी साहित्य.

**किंवा**

साहित्य आणि संस्कृतीच्या रा.ग.जाधव यांनी सांगितलेल्या मर्यादा.

ख) ग्रामीण जीवनाचे विशेष.

**किंवा**

कापूस खरेदी केंद्रातील भ्रष्ट कारभार.

ग) दलित साहित्यातील विद्रोहाचे स्वरूप.

**किंवा**

'सखी' या कवितेचा आशय.

५ अ) खालीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. १०

१) दि.के बेडेकरांनी वाचक व साहित्यिक यांच्यातील दुवा कोणास मानले आहे ?
२) रा.ग.जाधव यांनी साहित्याचे दुहेरी मूल्य कोणते सांगितले आहे ?
३) 'स्त्री - पुरुष तुलना' या ग्रंथाचे लेखन कोणी केले आहे ?
४) नारायणगावात 'ट्रॅक्टरवाला' म्हणून कोणाला ओळखले जाते ?
५) जगूचा भाचा मधू याने कोणते शिक्षण घेतले आहे ?
६) गढीच्या कापूस खरेदी केंद्रावर कोणाला मारहाण होते ?
७) हिरा बनसोडे यांनी 'महापुरुष' कोणाला म्हटले आहे ?
८) कवयित्रीने शब्दांना कोणती विनंती केली आहे ?

आ) खालील वाक्यातील गाळलेल्या जागी योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा. ०५

१) दि.के बेडेकर यांनी कलानिर्मिती हा एक ..................व्यापार वाटतो.

| | |
|---|---|
| क) कलात्म | ख) स्वायत्त |
| ग) रचनात्मक | घ) काव्यात्मक |



22144612C081AEEEE31A908FB7E78B74

२) गढीचा कापूस खरेदी केंद्रावर ..................शेतकऱ्यांना मार्गदर्शन करतात.

क) कांबळे गुरुजी ख) तुकाराम माने

ग) जिल्हाधिकारी घ) देवरा साहेब

३) ..................कापूस केंद्रावर कापूस घेऊन जाण्यास शेतकरी नकार देतात.

क) माजलगाव ख) मालेगाव

ग) होटगी घ) वाघापूर

४) भीमरायाच्या सामर्थ्यवान हातातली मी आहे तेजस्वी ..................

क) तलवार ख) लेखणी

ग) कट्यार घ) संगीनी

५) नेल्सल मंडेला, दक्षिण आफ्रिकेचा ..................

क) क्रांतीसूर्य ख) महामानव

ग) राष्ट्राध्यक्ष घ) नागरिक

****************



22144612C081AEEEE31A908FB7E78B74